पांडवानां धनंजय : !

सुमारे पंधरा वर्षांपूर्वी वरील शीर्षकाखाली मुंबईतल्या एका वृत्तपत्रात माझ्या वसंतमामांवर एक लेख प्रसिद्ध झाला होता. लेखक होते दादामामा - गोविंदराव हुजूरबाजार... माझ्या पाच मामांपैकी सर्वात वडील. ह्या पाच पांडवांपैकी वसंतमामा तिसरे. अर्जुनाप्रमाणे त्यांची बिरुदावली सर्वात मोठी. त्या प्रसंगी त्याना 'पद्मभूषण'चा बहुमान मिळाला होता.

डेनव्हर जवळ फोर्ट कॉलिन्स येथे दीर्घ आजारानंतर त्यांच्या मृत्यूची बातमी कानावर आली आणि मनात आठवणींची गर्दी सुरू झाली. कारण माझ्या जीवनात त्यांनी वेळोवेळी लहानपणी लाड आणि मोठेपणी मार्गदर्शन केले होते.

* * * * *

माझ्या आई वडिलांचे लग्न ठरले तेव्हाची गोष्ट... १९३७ सालची. ''माझ्याकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत ?'' त्यावेळी वडिलांनी विचारले होते.

''तुम्ही शिकलात तसे उच्च शिक्षण माझ्या भावांना मिळावे अशी संधी तुम्ही त्यांना द्या.'' आईचे उत्तर. माझे वडील केंब्रिजमध्ये गणिताचे उच्च शिक्षण घेऊन आणि संशोधन करून बनारस विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक व विभागप्रमुख झाले होते. हुशार मेव्हण्यांना प्रोत्साहन द्यायला त्यांना आनंदच वाटला.

माझ्या दोन मामांनी त्या संधीचा फायदा घेतला. गणित विषयात एम. ए. करून वसंतमामांनी १९४२ मध्ये बनारस विद्यापीठाचे चान्सेलर्स मेडल पटकावले तर एक दशकानंतर मोरूमामांनी तोच पराक्रम गाजवला. पुढे वसंतमामा पुणे विद्यापीठात गणित व संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख झाले तर मोरूमामा मुंबईतल्या विज्ञासंस्थेत गणित विभागाचे प्रमुख.

* * * * *

मोरूमामा बनारसमध्ये असताना मी शाळेत होतो. त्यामुळे त्यांच्याकडून मला गणिताची पुष्कळ मजा अनुभवायला मिळाली. वसंतमामा बनारसमध्ये होते तेव्हा मी वयाने लहान 'लालयेत् पंचवर्षाणि'च्या वयोमर्यादेत होतो. म्हणून माझ्या ज्या काही पुसट आठवणी आहेत त्यातून 'लाड करणारा मामा' हे चित्र उमटते... आणि तेच ह्या आठवणींच्या गर्दीत ठळक होत जाते.

उन्हाळ्याच्या सुटीत कोल्हापूरला आजोळी लाड व्हायचे त्यांत वसंतमामांचाही हातभार लागत असे. इंजिनियर दादामामा तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू बनवून देत तर वकील नानामामा गोष्टी सांगत असत. एकदा माझा मावस भाऊ झिप असलेला शर्ट घालून मिरवत होता. मी तसलाच शर्ट पाहिजे म्हणून हट्ट धरला कारण त्याकाळी झिप हा प्रकारच नवीन होता. वसंतमामा दुकाने धुंडाळून आले पण तसला शर्ट मिळाला नाही. दुसरा जास्त डौलदार शर्ट घेऊन आले. हा जास्त छान शर्ट आहे हे पटवण्याचा त्यांनी पुष्कळ प्रयत्न केला पण माझ्या बालमनाला तो पटत नव्हता. शर्टकथेचा शेवट काय झाला ते आठवत नाही... आठवतेय फक्त वसंतमामांची माझ्या समजुतीसाठी चाललेली धावपळ.

* * * * *

१९४६ साली आम्ही कोल्हापूरला गेलो तेव्हा वसंतमामा केंब्रिज यात्रेची तयारी करीत होते. त्यांच्या शिस्तबद्ध कामाची पहिली झलक मला त्यावेळी पहायला मिळाली.... म्हणजे टापटीप कशाला म्हणतात हे समजण्याची पात्रता माझ्यात थोडी थोडी येऊ लागली होती. ते स्टॅटिस्टिक्स आणि प्रोबेबिलिटी थियरी ह्या विषयावर पी. एच. डी. घ्यायला केंब्रिज विद्यापीठात जाणार होते. प्रॉबेबिलिटी थियरीचा पहिला पाठ मला त्यावेळी त्यांनी दिला.

''तुम्ही इंग्लंडला कसे जाणार ? बोटीने की विमानाने ?'' मी विचारले.

''बोटीने'' ह्या त्यांच्या उत्तराने मी जरा हादरलो. सिंदबादच्या सफरी, स्टीवनसनची 'किडनॅप्ड' कादंबरी, मर्चंट ऑफ वेनिस आदी गोष्टींत बोटीचा प्रवास म्हणजे वादळ आणि बोट बुडण्याचा प्रकार असे माझे समीकरण होते.

''तुम्ही विमानाने का नाही जात ? बोट बुडते बरेच वेळा !'' मी विचारले.

''प्रत्येक बोट बुडत नाही — क्वचित प्रसंगी एखादा अपघात होतो. हजार बोटींपैकी फार तर एक बुडत असेल ! तू वाचतोस त्या गोष्टी अशा क्वचित घडणाऱ्या प्रसंगांवर असतात. सुखरूप जाणाऱ्या बोटींवर गोष्ट कोण लिहिणार ?'' ते उत्तरले.

* * * * *

केंब्रिजहून त्यांची सुबक अक्षरांत पत्रे येत. तेच वळणदार अक्षर शेवटपर्यंत कायम होते. पण पत्रापेक्षा त्यांनी पाठवलेल्या खेळण्यांत आम्हा दोघा भावांना जास्त रुची साहजिकच वाटे. खेळातल्या बंदुकीपासून उत्तम जायरोस्कोपपर्यंत, प्रचंड जिगसॉपासून रंगीत चित्रांच्या पुस्तकांपर्यंत वसंतमामा केंब्रिजहून येणाऱ्याबरोबर पाठवीत. आणि केंब्रिजहून परतल्यावर स्वतःबरोबर.

हा त्यांचा लोभ आम्हा भाच्यांवर सतत राहिला. अखेर माझी केंब्रिजला जायची वेळ येऊन ठेपली. टाटा स्कॉलरशिपसाठी मी अर्ज केला आणि ती मला मिळाली तेव्हा माझ्यापेक्षा वसंतमामांना जास्त आनंद झाला. टाटा एंडावमेंट फंडाकडून त्यांनाही (माझ्या

# माझे वसंतमामा

—जयंत नारळीकर



डॉ. वसंतराव हुजूरबाजार आणि जयंत नारळीकर (१९६० मधील छायाचित्र)

**प्रा. वसंत शंकर हुजूरबाजार यांचे १५-११-९१ रोजी अमेरिकेत निधन झाले. त्यांच्या काही आठवणी**

वडिलांप्रमाणेच) स्कॉलरशिप मिळाली होती. योगायोगाने त्यावेळी फंडाच्या डायरेक्टर असलेल्या पिरोजा व्हेसुगार माझ्या वेळीही डायरेक्टर होत्या. बाई तशा फटकळ आणि तऱ्हेवाईक ! पण मनाने कनवाळू. वसंतमामा त्यांना भेटले आणि 'हा माझाच भाचा' म्हणून सांगितले. आणि व्हेसुगारबाईंची कळी खुलली. परीक्षेतील (भारतातल्या) यशावर त्यांचा फारसा विश्वास नव्हता म्हणून माझ्या 'फर्स्ट क्लास फर्स्ट'ला त्यांनी फारसे महत्त्व दिले नव्हते, पण ज्याचे वडील आणि मामा टाटा स्कॉलर म्हणून यशस्वी झाले तो पण यश मिळवण्याची संभाव्यता आहे असा प्राबेबिलिटी थियरीचा पाठ वसंतमामांनी बाईंना दिला असावा.

ज्याचे शिक्षण हॉस्टेलचा आधार न घेता झाले असा आपला मुलगा सलग तीन वर्षे 'साता समुद्रा पलीकडे' जाऊन परदेशी शिक्षण घेणार म्हणून आईवडिलांना काळजी वाटत असेल... पण त्यांनी ती प्रत्यक्ष कधी व्यक्त केली नाही. वसंतमामांनी मात्र मला 'तयार' करायला सुरुवात केली. केंब्रिजमध्ये लॉजिंग्समध्ये राहण्याची पद्धत कशी असते, कॉलेजचे जेवण कसे असते, लेक्चर्स कुठे आणि कशी होतात, थंडीपासून काळजी कशी घ्यायची, पाश्चात्य संडास-बाथरूम कसे वापरायचे इत्यादी सविस्तर माहिती मला दिली. पुण्यात दोराबजीकडून बेकन आणून 'नॉन व्हेज'चा पहिला पाठ दिला. प्रवासात आवश्यक कपडे, बॅगा, इत्यादी विकत घ्यायला मदत केली.

इतकेच नव्हे, केंब्रिजमधल्या प्राध्यापकांसाठी काही भेटवस्तू माझ्याजवळ दिल्या. त्या पोचवताना माझी त्यांच्याशी आपोआप ओळख झाली आणि मला केंब्रिजला पोचल्यावर परकेपणा - एकटेपण कधी जाणवले नाहीत. केंब्रिजवर वसंतमामांनी घेतलेल्या बौद्धिकांमुळे मला एका पूर्वपरिचित जागेत आलोय असेच वाटले.

* * * * *

प्रत्येक नवे काम हाती घेताना पुरेशी पूर्वतयारी करणे हा वसंतमामांचा नियम होता. पुणे विद्यापीठात गणित आणि संख्याशास्त्र विभागाला मूर्त स्वरूप देताना, तेथे इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीची कॉन्फरन्स भरवताना, किंवा वेगवेगळ्या कार्यशाळांचे आयोजन करताना त्यांनी हा नियम अमलात आणला. पुणे विद्यापीठात असताना देशातल्या अनेक समित्यांवर महत्त्वाची कामे त्यांनी केली. त्यावेळी प्रवास पुष्कळ केला पण तोसुद्धा पुष्कळ पूर्वतयारीनिशी.

पुणे विद्यापीठातून निवृत्त होण्यापूर्वी दोन वर्षे ते परदेशी गेले आणि निवृत्तीनंतर अध्यापन संशोधन चालू रहावे म्हणून अमेरिकेत डेनव्हर विद्यापीठात प्राध्यापक म्हणून बारा वर्षे त्यांनी काम केले. इथेसुद्धा पूर्ण तयारीनिशी शिकवणारा प्राध्यापक म्हणून त्यांची ख्याती होती. आणि विद्यार्थी त्यांनी दिलेले गृहपाठ आवर्जून करत. ह्या त्यांच्या कामगिरीबद्दल आणि त्यांच्या संशोधनाबद्दल डेनव्हर विद्यापीठाने त्यांना एमेरिटस प्रोफेसर केले. (हाच बहुमान पुणे विद्यापीठाकडून मिळावा ही त्यांची पुष्कळ वर्षांची इच्छा होती, ती मात्र अपुरीच राहिली.)

अशा ह्या योजनाबद्ध जीवन जगणाऱ्या वसंतमामांना जगात सर्वच काही शिस्तीत घडत नसते याचे पण अनुभव आले ! वेळ वाचवण्यासाठी एकदा त्यानी दादर ते व्ही. टी. लोकल पकडली आणि त्यात त्यांचा खिसा कापला गेला. त्यावेळी डब्यात गर्दी इतकी तुफान की, आपला खिसा कापला जातोय, हे त्यांना जाणवत होते पण काही करता येत नव्हते. ते स्वतः कार चालवीत नसत. कारण कार ड्रायव्हिंगबद्दल त्यांच्या मनात नेहमी नर्व्हसनेस असे. कारमध्ये बसताना ते ड्रायव्हरला सावधगिरीच्या पुष्कळ सूचना करीत. असे असून त्यांना दोन कार अपघात सोसावे लागले. १९६२ मध्ये अमेरिकेत वॉशिंग्टन येथे पहिला अपघात त्यांच्या चालकामुळे नाही तर दुसऱ्या चालकाच्या हलगर्जीपणामुळे झाला. त्यानंतर त्यांनी कारमध्ये पुढे बसायचे टाळले. काही महिन्यांनी आयोवाच्या थंडीत कार बर्फावर घसरली. चालक आणि पुढे बसलेला दोघे सीटबेल्ट असल्यामुळे किरकोळ दुखापतीवर बचावले. त्याकाळी मागच्या सीटसाठी बेल्ट नसत (असते तर वसंतमामांनी नक्कीच बांधले असते !) व त्यामुळे त्यांनाच जबर मार बसला.

वसंतमामांना त्यांच्या क्षेत्रात बहुमान लाभले. त्यांच्या संशोधनात्मक निबंधावर त्यांना केंब्रिज विद्यापीठाचे ॲडम्स प्राइझ मिळाले. रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीचे ते फेलो होते तसेच भारतातील ॲकॅडमींचेपण. आपल्या विषयावर बोलतानादेखील ते विनोदप्रचुर बोलत. अलीकडेच त्यांचे एक भाषण, त्यांचे केंब्रिजमधील पूर्वीचे गुरू सर हॅरोल्ड जेफरीज यांच्या आठवणी सांगणारे पुष्कळ गाजले होते.

सर हॅरोल्ड १९८९ मध्ये स्वर्गवासी झाले... आणि गुरू पाठोपाठ शिष्योत्तम ही दोन वर्षांनी. आता त्यांच्यामागे त्यांच्या दोनही कन्या स्टॅटिस्टिक्समध्ये डॉक्टरेटसाठी संशोधन करत आहेत व ही परंपरा पुढे चालू ठेवतील.